# भाग्यात  तुझ्याही ?

वाहतात तुझे
कण काळाचे
क्षणाक्षणातून
अंगामध्ये
होण्या कैदी -----
कलिकेसम नव,
रंगविसी तू
जीव जगतातील
आनंदाडोही
होण्या आनंदी -----

फुलविसी कुणाचा
वृक्ष सुखाचा
पडणा-या पर्णी
करण्या पाचोळा
भूगर्भी भरणी ------
मातीलाही
साकारीत तू
स्वत:च होशी
स्वयंभु जगी
मूर्ती ---------

सारे आम्ही
गुणाकार तव
परी शेवटी
एकटाच तू
जीव सदाशिव-------
नच निर्विकार तू
ना निराकार तू
डी एन् ए  तव
अनंतातला
सगुणाकार --------
क्षणभर होऊन
नवीन मूर्ती
जगसी मरसी
भाग्यात तुझ्याही
भागाकार!-------

विजय पाठारे
आरिझोना